पुरोगामी विचाराचे
एकमत

# २०० पेक्षा जास्त झाडे तोडण्याची परवानगी देण्याचा अधिकार पुन्हा स्थानिक स्वराज्य संस्थांना !

By **एकमत ऑनलाइन** - July 28, 2023



मुंबई : एखाद्या प्रकल्पासाठी २०० पेक्षा अधिक झाडेकिंवा पुरातन वृक्ष तोडण्याची परवानगीचा देण्याचा अधिकार राज्य वृक्ष प्राधिकरणाला देणाचा निर्णय आदित्य ठाकरे यांनी पर्यावरण मंत्री असताना घेतला होता. मात्र राज्य सरकारने या कायदयात बदल करून झाडे तोडण्याचे परवानगीचे अधिकार पूर्वीप्रमाणेच स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी कायद्यात बदल करणारे महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन सुधारणा विधेयक शुक्रवारी विधानसभेत मंजूर करण्यात आले. यावेळी भाजपाच्या आशिष शेलार यांच्यासह सत्ताधारी पक्षाच्या आमदारांनी ठाकरे गटावर जोरदार टीकास्त्र सोडले.

आघाडी सरकारच्या काळात आदित्य ठाकरे पर्यावरण मंत्री असताना २०० पेक्षा अधिक झाडे आणि हेरिटेज झाडे तोडण्याबाबत परवानगी देणारे अधिकार एका विधेयकाद्वारे महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाला दिले होते. मात्र हा निर्णय नवीन सरकारने पुन्हा फिरवला आहे. विधानसभेत मंत्री उदय सामंत यांनी महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन सुधारणा विधेयक मांडले. झाडांचे संवर्धन आणि वृक्ष तोडीसंदर्भात हे विधेयक आहे. २०० वृक्ष तोडण्यासंदर्भातील परवानगी ही महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाला होती. आता या विधेयकात सुधारणा करून

पुरातत्व वृक्षकिंवा २०० पेक्षा जास्त वृक्ष तोडायचे असतील तर त्याची परवानगी स्थानिक प्राधिकरणाला देण्याचे अधिकार या विधेयकातून देण्यात आल्याचे सामंत यांनी सांगितले.

भाजपाच्या आशिष शेलार यांनी विधेयकावर बोलताना तत्कालीन पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली. या बदलांमुळे मुंबई महापालिकेच्या अधिकारावर गदा आणण्यात आली होती. ठाकरे गटाचा नेहमीच विकास कामांना विरोध राहिला आहे. मुंबईत मेट्रो, कोस्टल रोड, बुलेट ट्रेन या प्रत्येक प्रकल्पाला विरोध करण्याचे काम ठाकरे गटाने केले. प्रत्येक विकास प्रकल्पाला विरोध करणारी 'उबाठा सेना' एक दिवस मुंबईकारांना बैलगाडीतून फिरा असेही सांगायला कमी करणार नाही असा टोलाही त्यांनी लगावला. केवळ आपल्याकडे अधिकार असायला हवेत म्हणून हे बदल तत्कालीन पर्यावरण मंत्र्यांनी केले होते, असा आरोपही शेलार यांनी केला. २०० पेक्षा जास्त झाडे कापण्याची वेळ फक्त मोठया प्रकल्पांच्या वेळीच येते. हे प्रकल्प यांना नको आहेत. मात्र बिल्डरांच्या आठ-दहा झाडे कापण्याकडे यांचे लक्ष नव्हते असा टोलाही शेलार यांनी लगावला.

महाविकास आघाडीच्या काळात आणलेल्या या विधेयकामागील हेतू स्पष्ट करताना आदित्य ठाकरे म्हणाले की, राज्यातील हेरीटेज झाडांचा शोध घेणे हा त्यामागील प्रमुख हेतू होता. साधारणपणे ५०-१०० वर्षे जुनी झाडे शोधून काढणे त्याशिवाय हेरीटेज वृक्ष झाड कापायची वेळ आलीच तर त्या झाडाची नुकसान भरपाई किती द्यावी म्हणजे झाडाच्या वयाप्रमाणे नुकसान भरपाई असावी आणि एक झाड कापल्यावर साधारणपणे सहा झाडे लावावी लागतात पण हे सर्व करताना पर्यावरणविषयक दृष्टीकोन बाळगला पाहिजे. कारण 'इज ऑफ डुईंग बिझनेस' महत्वाचे आहेच पण त्यापेक्षा 'ईझ ऑफ लिंिव्हग' महत्वाचे आहे, असे आदित्य ठाकरे म्हणाले. वृक्ष तोडीचा विषय हा केवळ मुंबई पुरता मर्यादित नाही तर संपूर्ण महाराष्ट्राचा प्रश्न आहे, असे सांगतानाच हे सुधारणा विधेयकावर विचार करणे गरजेचे आहे असे आवाहन त्यांनी केले. या विधेयकाला काँग्रेसचे नेते व माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी आक्षेप घेत आदित्य ठाकरे यांच्या संकल्पनेचे कौतुक केले.

**एकमत ऑनलाइन**

*http://news.dainikekmat.com*